जनसामान्यांची महाशक्ती

# नवशक्ति

सा शक्तिर्या विमुक्तये



'ख्वो-गो' च्या निर्मात्यांचे उत्कृष्ट उत्पादन
(आयुर्वेदिक मेडिसिन)
हजमबोल®
गॅस, अपचन, ॲसिडिटी, पोट साफ न होणे इत्यादी पोटांच्या विकारांवर गुणकारी.
सिर्फ २ गोली और गॅस खाली...
अहिल्या फार्मास्युटीकल्स
CUSTOMER CARE : 8108130009 / 022-28740297

www.navshakti.co.in | मुंबई | वर्ष ७९ वे अंक : २१० | शुक्रवार, ३० मे २०१४ | पाने : २८+८=३६ | किंमत ३ रुपये | Reg.No.MH/MR/South-104/2012-14 M.P.C.S. Office Mumbai-400001



वृत्तनिवेदक प्रदीप भिडे

# जून, जुलैला रिमझिम पावसाचे शुभवर्तमान!

## 'नवशक्ति-फ्री प्रेस जर्नल'च्या कार्यक्रमात हवामान तज्ज्ञांचा दिलासा

- १० जूनच्या आसपास मुंबईत शुभागमन शक्य!
- देशात सरासरी पावसापेक्षा यंदा कमी पर्जन्यमानाचा अंदाज
- अल नीनोची धास्ती नको, पाणी बचतीवर भर हवा
- हवामानाचा अंदाज ब्लॉकस्तरावर देण्याचा विचार
- गोरेगावातही डॉप्लर रडार बसविण्याची योजना

मुंबई, गुरुवार (प्रतिनिधी) - देशात यंदा सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान होईल याचा पुनरुच्चार करतानाच, मुंबईत १० जूनच्या आसपास पावसाचे शुभागमन होईल व राज्यात जून, जुलै महिन्यात चांगल्या पावसाचे शुभवर्तमान भारतीय हवामान खात्याचे उपमहासंचालक के एस होसाळीकर व संचालक व्ही के राजीव यांनी दैनिक 'नवशक्ति-फ्री प्रेस जर्नल' वृत्तपत्रसमूहाने इंडियन मर्चंट चेंबरच्या किलाचंद सभागृहात आज सायंकाळी आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलताना वर्तविले. वक्ते व श्रोते यांच्यातील मनमोकळ्या संवादाने हा शानदार कार्यक्रम उत्तरोत्तर बहरत गेला.

देशात सामान्यत: सरासरी ९५ टक्के पाऊस पडतो. यंदा त्यापेक्षा कमी म्हणजे सरासरी ८९ टक्के पर्जन्यमान अपेक्षित आहे. येत्या जून, जुलै महिन्यात चांगला पाऊस पडेल व ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यात काहीसे कमी पर्जन्यमान अपेक्षित असल्याचे भारतीय हवामान खात्याचे उपमहासंचालक होसाळीकर यांनी स्पष्ट केले. हवामान विभागात अत्याधुनिक यंत्रसामग्री बसविण्यात आल्याने भारतीय हवामान खात्याचे अंदाजही आता अचूक ठरत असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले.



'आरसीएफ'चे विपणन संचालक अशोक घसघसे, 'एलआयसी नोम्युरा म्युच्युअल फंडा'चे व्यवस्थापकीय संचालक नीलेश साठे



'नवशक्ति-फ्री प्रेस जर्नल' वृत्तपत्र समूहाचे व्यवस्थापकीय संचालक अभिषेक कर्नानी, भारतीय हवामान खात्याचे उपमहासंचालक के एस होसाळीकर




'एक्सेल इंडस्ट्रिज लिमिटेड'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अश्विन श्रॉफ, 'जैन इरिगेशन सिस्टीम लिमिटेड कंपनी'चे व्यवस्थापकीय संचालक अनिल जैन आणि भारतीय हवामान खात्याचे संचालक व्ही के राजीव.

ओरिसाच्या वादळाची पूर्वसूचना आम्ही स्थानिक प्रशासनाला वेळीच दिल्याने आणि राज्य सरकारने तत्परतेने कारवाई केल्याने तेथील मनुष्यहानी व वित्तहानीची तीव्रता कमी झाल्याचे त्यांनी मोठ्या अभिमानाने सांगितले.

राज्यातील शेतकऱ्यांना दर मंगळवारी व शुक्रवारी हवामानाचा अंदाज पुणे वेधशाळेमार्फत कळविला जातो. पुणे वेधशाळेतून प्रत्येक जिल्हा व तालुकास्तरावर हवामानाविषयी शेतकऱ्यांना व नागरिकांना सजग केले जाते. यापुढे हवामानाचा अंदाज केवळ जिल्हास्तरावरून न देता, ब्लॉकस्तरावर देण्याचा मानस (पान ४)

पान १ वरुन

## जून, जुलैला रिमझिम पावसाचे शुभवर्तमान!

राजीव यांनी व्यक्त केला.

बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यानंतर नैऋत्य मोसमी वाऱ्यांसाठी अनुकूल वातावरण निर्माण होते. हे वारे उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहतात. काही वारे अरबी समुद्राकडून दक्षिणेकडील किनारपट्टीवर येऊन धडकतात. परिणामी, राज्यात पावसाला अनुकूल वातावरण तयार होते. आताही नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी अंदमान बेटापर्यंत येऊन धडक दिली आहे. केरळ, कोकण, कर्नाटक, पश्चिम घाटाला वळसा घालून हे वारे हिमालयाच्या दिशेने जातात. अशाप्रकारे संपूर्ण भारतभर पाऊस व्यापून राहतो. परतीचा पाऊस तामिळनाडू, केरळ, कर्नाटकात पुन्हा पडतो. त्यामुळे केरळला चारऐवजी सात महिने पाऊस पडतो. म्हणून तिथे हिरवाई अधिक आहे. रडार व उपग्रहाच्या छायाचित्रांच्या आधारे ढगांची गर्दी कशी जमते याविषयीची रंजक माहितीही त्यांनी अलगद उलगडून सांगितली. ग्लोबल वार्मिंगमुळे अतिवृष्टी, अतिदुष्काळ यासारख्या संकटांचा सामना यापुढे आपल्याला करावा लागणार असल्याचा सूचक इशाराही त्यांनी दिला.

हवामान साक्षरतेच्या सादरीकरणापेक्षा प्रत्यक्ष संवादावर राजीव यांनी अधिक भर दिला. कुलाब्यापाठोपाठ मुंबईच्या गोरेगाव उपनगरातही डॉप्लर रडार बसविण्याची योजना असल्याचे सांगतानाच, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील किनारपट्टीवरील गावागावात जाऊन हवामान साक्षरता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले.

'अल नीनो'ची अवास्तव धास्ती बाळगण्याचे कारण नसल्याचे राजीव यांनी 'आरसीएफ'चे विपणन संचालक अशोक घसघसे यांच्या प्रश्नाला उत्तर देताना स्पष्ट केले. पवन ऊर्जा प्रकल्पांमुळे पावसाच्या मार्गात अडथळे येत असल्याची चर्चा ऐकावयास मिळते असे 'एलआयसी नोम्युरा म्युच्युअल फंडा'चे व्यवस्थापकीय संचालक नीलेश साठे यांनी निदर्शनास आणले असता, मान्सूनवारे खूपच उंचावरून वाहत असल्याने ते पवनऊर्जा प्रकल्पाच्या मार्गात अडथळे ठरण्याची शक्यता नसल्याचे राजीव यांनी स्पष्ट केले.

पावसाचे दहा टक्के पाणी समुद्रात जाण्यापासून रोखायला हवे

आगामी काळात पाण्यावरून युध्द होण्याची भीती व्यक्त होत असल्याचे सूत्रसंचालक प्रदीप भिडे यांनी निदर्शनास आणले. त्यावर आपली भूमिका स्पष्ट करताना राजीव म्हणाले, मुंबईसह कोकणात धो धो पाऊस पडतो आणि समुद्राला जाऊन मिळतो. एकूण पर्जन्यमानापैकी एक टक्का पावसाचे पाणी अडविले जाते. मात्र, प्रत्यक्षात बंधारे, धरणे, विहिरी, तलाव यांच्या माध्यमातून दहा ते पंधरा टक्के पाणी समुद्रात जाण्यापासून रोखण्याची गरज आहे. एवढेच नव्हे तर नद्या जोडसारख्या महत्वाकांक्षी प्रकल्पाकडे नव्या सरकारने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

बेसुमार जंगलतोडीचा पावसावर प्रतिकूल परिणाम

बेसुमार जंगलतोडीचा पावसावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे सांगून राजीव म्हणाले की, देशातील पर्जन्यमान कमी होण्याच्या कारणापैकी जंगलतोड हेही एक प्रमुख कारण आहे. हिरवाई वाढली तर पाऊसही दगा देणार नाही.

शेती मान्सूनप्रुफ हवी ! गावागावात पाणीसाठवण व्हावी !

सिंचनाचे महत्त्व विशद करतानाच, गावागावातील शेतकऱ्यांनाही हवामानाचा अंदाज कळणे आवश्यक असल्याचे 'जैन इरिगेशन सिस्टीम लिमिटेड कंपनी'चे व्यवस्थापकीय संचालक अनिल जैन यांनी सांगितले. ते म्हणाले, ठिबक सिंचनाच्या विविध उपाययोजनांच्या माध्यमातून आम्ही निम्म्या पाण्याची बचत करतो व अन्नधान्याचे, फळांचे उत्पादनही दुप्पट मिळवून देतो. भारतात बारा कोटी शेतकरी आहेत. त्यांना दारिद्र्यातून, कर्जातून बाहेर काढण्यासाठी शेती 'मान्सूनप्रुफ' करण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक गावागावात पाणीसाठवण झाली तर हा पुरक पाणीसाठाच कमी पर्जन्यमानावर रामबाण उपाय ठरेल यात शंका बाळगण्याचे कारण नाही. ज्या ठिकाणी खूपच पाऊस पडतो, त्या ठिकाणी ग्रीनहाऊस हा पर्याय आहे.

'एक्सेल इंडस्ट्रिज लिमिटेड'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अश्विन श्रॉफ म्हणाले की, बँकेच्या बचत खात्याप्रमाणेच पावसाच्या प्रत्येक थेंबाची साठवण करण्याची योजना राबविण्याची काळाची गरज बनली आहे. पर्जन्य जलसंचयसुध्दा करायला हवाय. अमृततुल्य पाणी मिळाले तर शेतकऱ्यांची हिम्मत व उत्साहही वाढतो. परिणामी, अन्नधान्याच्या उत्पादनातही वाढ होते.

स्वागत आणि आभार !

प्रारंभी 'नवशक्ति'चे संपादक प्रकाश कुलकर्णी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. नवशक्ति - फ्री प्रेस वृत्तपत्र समुहाचे व्यवस्थापकीय संचालक अभिषेक कर्नानी यांच्या हस्ते भारतीय हवामान खात्याचे उपमहासंचालक के एस होसाळीकर, संचालक व्ही के राजीव, 'जैन इरिगेशन सिस्टीम लिमिटेड कंपनी'चे व्यवस्थापकीय संचालक अनिल जैन, एक्सेल इंडस्ट्रिज लिमिटेड'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अश्विन श्रॉफ, 'एलआयसी नोम्युरा म्युच्युअल फंडा'चे व्यवस्थापकीय संचालक नीलेश साठे, 'आरसीएफ'चे विपणन संचालक अशोक घसघसे, मुंबईचे माजी उपमहापौर अरुण देव यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. आपल्या भारदस्त आवाजात व ओघवत्या शैलीत सुप्रसिध्द निवेदक प्रदीप भिडे यांनी कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन केले तर प्रकाश कुलकर्णी यांनी आभार मानून कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद दिले. याप्रसंगी नवशक्ति-फ्री प्रेस वृत्तपत्र समुहाच्या अंकिता कर्नानीही उपस्थित होत्या. ज्येष्ठ बँकर चंद्रकांत अनगोळकर हेही कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते.

## मोदींचा दहासूत्री कार्यक्रम

मोदी यांनी केली आहे.

आपला दहासूत्री कार्यक्रम लोकांपर्यंत पोहोचावा यासाठी मोदींनी संसदेचे अधिवेशन पार पडल्यावर देशाला संबोधित करण्याचे ठरवले आहे. दरम्यान,